मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भरत जाधव यांचा महापालिका सफाई कर्मचाऱ्यांशी संवाद

## महापालिकेच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांसाठी 'आता थांबायचं नाय' या चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग



**पिंपरी | प्रतिनिधी**

सफाई कर्मचाऱ्यांसाठी "आता थांबायचं नाय" या चित्रपटाच्या विशेष स्क्रीनिंगचे आयोजन करून पिंपरी चिंचवड महापालिकेने त्यांना प्रेरणा देण्याचे तसेच त्यांच्यामध्ये शिक्षणाचे महत्व रूजविण्याचे जे काम केले आहे ते कौतुकास्पद असून शिक्षणासाठी झगडणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आवाज या माध्यमातून प्रत्येकापर्यंत पोहोचविण्यास मदत होईल असे गौरवद्गार सुप्रसिद्ध मराठी अभिनेते भरत जाधव यांनी काढले.

पिंपरी पिंपरी चिंचवड महापालिका आपल्या कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमता व मानसिक आरोग्याच्या वाढीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असते. अशाच एका उपक्रमाअंतर्गत महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे सफाई सेवकांसाठी 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत 'आता थांबायचं नाय' या प्रेरणादायी मराठी चित्रपटाचे खास स्क्रीनिंग आज पिंपरी येथील विशाल सिनेमा येथे आयोजित करण्यात आले होते.

या विशेष कार्यक्रमास उप आयुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मुख्य आरोग्य निरीक्षक श्रीराम गायकवाड यांच्यासह विशाल थिएटरचे संचालक वसंत पिंपळे, विशाल पिंपळे, युवराज पिंपळे आणि आरोग्य विभागाचे कर्मचारी आदी उपस्थित होते.

अभिनेते भरत जाधव म्हणाले, शहर स्वच्छता ही सामाजिक जबाबदारी मानून सफाई सेवक पहाटेपासून शहर स्वच्छ सुंदर ठेवण्याची जबाबदारी पार पाडतात. स्वच्छतेचे रिअल हिरो ते आहेत, मी तर केवळ भूमिका पार पाडली. "आता थांबायचं नाय" हा केवळ एक चित्रपट नाही, तो सामान्य माणसाच्या असामान्य जिद्दीची गोष्ट आहे. शिक्षण ही प्रत्येकाची मूलभूत गरज आहे मग तो अधिकारी असो की सफाई कामगार हा संदेश या चित्रपटाच्या माध्मातून देण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षणासाठी झगडणाऱ्या या कर्मचाऱ्यांची कहाणी मला भावली. त्यांच्या जिद्दीला सलाम करत अशी प्रेरणादायी सत्यकथा सगळ्यांसमोर मांडणे ही कलाकार म्हणून माझी जबाबदारी आहे असे मला वाटले आणि संपुर्ण महाराष्ट्रात सध्या हा चित्रपट गाजतो आहे. विशेषत: पिंपरी चिंचवड महापालिकेने पुढाकार घेऊन सफाई कर्मचाऱ्यांना हा चित्रपट दाखवला ही बाब कौतुकास्पद आहे.

उप आयुक्त सचिन पवार म्हणाले, सफाई सेवकांच्या दैनंदिन संघर्ष, अडचणी आणि अनुभवांवर आधारित असलेल्या "आता थांबायचं नाय" चित्रपटामध्ये त्यांचे कार्य समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ही कलाकृती सफाई कामगारांच्या मेहनतीची आणि योगदानाची दखल घेणारी आहे. त्यांच्या कामाबद्दल समाजामध्ये आदर व जागरूकता निर्माण करण्याचे उद्दिष्ट या स्क्रीनिंगमागे आहे. आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या निर्देशानुसार अशा प्रकारचा उपक्रम प्रथमच पिंपरी चिंचवडमध्ये राबविला जात आहे. सफाई सेवकांमध्ये नवचैतन्य निर्माण करणे, कामाबाबत सजगता वाढवणे व त्यांच्या कार्याला प्रेरणा देणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमामुळे सफाई सेवकांनाही त्यांच्या कार्याचा अभिमान वाटेल, आणि अधिक जोमाने काम करण्यासाठी प्रेरणा मिळेल.

---

# आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'निर्जली' ठरला सर्वोत्तम चित्रपट

## पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा शानदार पुरस्कार सोहळा दिमाखात संपन्न




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'निर्जली' या आशयसंपन्न चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मान पटकावत महोत्सवाच्या केंद्रस्थानी स्थान मिळवले, तमिळ भाषेतील 'थुनाई' या लघुपटाने साऱ्यांची मने जिंकून सर्वोत्कृष्ट लघुपट पुरस्कार आपल्या नावे केला. तर सर्वोत्कृष्ट ॲनिमेशन फिल्ममध्ये 'लेस' ने बाजी मारली.

या महोत्सवात भारतासह ४० देशांमधून आलेले ९० पेक्षा अधिक चित्रपट, लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन आणि ६० सेकंद फिल्म्स प्रदर्शित करण्यात आले. यामध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार प्रियंका भेरिया आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार तुषार शिंगाडे यांना प्रदान करण्यात आला. आंतरराष्ट्रीय स्तरावर पिंपरी चिंचवड शहराचे नाव सुलतान या लघुपटाच्या माध्यमातून गाजवत असलेले दिग्दर्शक अविनाश कांबीकर यांचाही विशेष सन्मान यावेळी करण्यात आला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा पुरस्कार वितरण समारंभ दिमाखात संपन्न झाला. आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या नेतृत्वाखाली आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात पार पडलेल्या या सोहळ्यात देश-विदेशातील कलावंतांना विविध विभागांतील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. प्रत्येक चित्रपटामागची कल्पकता, सामाजिक जाणीव, दिग्दर्शन आणि तांत्रिक कसोट्या अनुभवायला प्रेक्षकांनी गर्दी केली होती.

यावेळी राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, महापालिका उप आयुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, सुप्रसिद्ध लेखक दिग्दर्शक सुजय डहाके, रमेश होलबोले, अभिनेत्री राजश्री देशपांडे, मुख्यमंत्री सहाय्यक शुभम सातकर, रयत शिक्षण संस्थेमधील प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटीचे अध्यक्ष दत्ता गुंड, मुंबा फिल्म फाऊंडेशनचे अध्यक्ष जय भोसले, महोत्सव संचालक अभिषेक अवचार, व्यवस्थापकीय संचालक सायली शिंदे, महोत्सव सचिव डॉ. विश्वास शेंबेकर, ज्युरी सदस्य हेमंत अवताडे, महात्मा फुले विद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष विशाल मासुळकर, सोमनाथ शितोळे, विजय गुंड , प्रियांका चौधरी, माधुरी धमाले, ॲड. धम्मराज साळवे, आकाश माळी, ऐश्वर्या डोरले, इमरान शेख, राम दत्तकला, अविनाश कांबीकर, पालक कौल, श्रुती जाधव, किशोर काळे, संतोष शिंदे आदी उपस्थित होते.

# राज्यभरात करोनाचे सर्वाधिक रुग्ण पुण्यात!

## मुंबई, पिंपरी-चिंचवडसह इतर ठिकाणीही करोना रुग्णसंख्येत मोठी वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील करोना रुग्णसंख्येत मोठी वाढ झाली असून, गेल्या २४ तासांत ६५ रुग्ण आढळले आहेत. त्यात पुण्यात सर्वाधिक २५ रुग्ण असून, त्याखालोखाल मुंबईत २२ रुग्णांची नोंद झाली आहे. राज्यात या वर्षातील करोनाची एकूण रुग्णसंख्या ८१४ वर पोहोचली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात गेल्या २४ तासांत करोनाचे ६५ रुग्ण आढळले. त्यात पुणे महापालिका २५, मुंबई २२, ठाणे महापालिका ९, पिंपरी-चिंचवड महापालिका ६, कोल्हापूर महापालिका २ आणि नागपूर महापालिका १ अशी रुग्णसंख्या आहे. राज्यात १ जानेवारी ते १ जूनपर्यंत ११ हजार ५०१ संशयित करोना रुग्णांच्या चाचण्या करण्यात आल्या. त्यात ८१४ रुग्णांना करोनाचे निदान झाले. त्यात मुंबईत सर्वाधिक ४६३ रुग्णांची नोंद झाली आहे. राज्यातील करोनाची सक्रिय रुग्णसंख्या ५०६ असून, ३०० रुग्ण बरे झाले आहेत.

राज्यात जानेवारीपासून आतापर्यंत करोनाच्या ८ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यातील सात रुग्ण सहव्याधीग्रस्त होते. त्यातील एका रुग्णास मूत्रपिंडविकारासह चेताविकार होता, तर दुसऱ्या रुग्णास कर्करोग होता. तिसऱ्या रुग्णास ब्रेन स्ट्रोक आला होता आणि त्याला अपस्माराचा आजार होता. चौथ्या रुग्णास गंभीर स्वरूपाचा मधुमेहाचा आजार होता. पाचव्या रुग्णास फुफ्फुसाचा आजार होता. सहाव्या रुग्णास मधुमेहासह अर्धांगवायू झाला होता. सातव्या रुग्णास गंभीर स्वरूपाचा श्वसनविकार होता तर आठव्या रुग्णास ताप आणि धाप लागणे अशी लक्षणे होती, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.




> राज्यात करोना रुग्णांमध्ये तुरळक वाढ दिसून येत आहे. यामुळे श्वसनविकाराच्या रुग्णांचे सर्वेक्षण करून त्यांची करोना चाचणी केली जात आहे. रुग्णांमध्ये सौम्य लक्षणे दिसून येत असल्याने नागरिकांनी घाबरू नये.
>
> **- डॉ. बबिता कमलापूरकर, सहसंचालिका, आरोग्य विभाग.**

**राज्यातील करोना संसर्ग (1 जानेवारी ते 1 जून)**

- करोना चाचण्या – ११ हजार ५०१
- एकूण रुग्ण – ८१४
- मुंबईतील रुग्ण – ४६३
- सक्रिय रुग्ण – ५०६
- बरे झालेले रुग्ण – ३००
- रुग्ण मृत्यू – ८

# ढोल-ताशांच्या गजरात ‘दख्खनची राणी’ मार्गस्थ

## डेक्कन क्वीन या रेल्वेचा 96 वा वाढदिवस रविवारी मोठ्या थाटामाटात साजरा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे आणि मुंबई या शहरांना जोडणाऱ्या ‘दख्खनची राणी’ अर्थात डेक्कन क्वीन’ या रेल्वेचा ९६ वा वाढदिवस रविवारी मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. केक कापून गाडीला मानवंदना दिली. तसेच, रेल्वे प्रशासनातील अधिकारी आणि रेल्वे चालकांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर हारफुलांनी सजविलेली गाडी ढोल-ताशांच्या गजरात नियोजित वेळेनुसार सकाळी सव्वासात वाजता मुंबईच्या दिशेने रवाना झाली.

मध्य रेल्वे पुणे विभागाचे वाणिज्य व्यवस्थापक तथा जनसंपर्क अधिकारी हेमंत कुमार बेहरा, पुणे रेल्वे स्थानक संचालक संजय कुमार, व्यवस्थापक रवींद्र धुमाळ आणि अन्य प्रमुख रेल्वे अधिकारी उपस्थित होते, तर रेल्वे प्रवासी संघाच्या अध्यक्षा हर्षा शहा, सदस्य ॲड. आशुतोष रानडे, ॲड. संजय रायरीकर, गणपत मेहता आणि सुधीर शहा या वेळी उपस्थित होते.

हर्षा शहा म्हणाल्या, ‘ही केवळ गाडी नसून, त्यामध्ये आमच्या गेल्या ९६ वर्षांच्या आठवणी, प्रसंग आणि अनुभव आहे. जीवनातील आमूलाग्र बदलामध्ये डेक्कन क्वीनचे महत्त्वाचे योगदान आहे. पिढ्यान् पिढ्या चांगल्या-वाईट आठवणी जपणारी आणि शहरांबरोबरच माणसे जोडून देणाऱ्या या गाडीचे आमच्या हृदयात विशेष स्थान आहे. प्रवाशांना निसर्गरम्य घाटातून प्रवास करताना सह्याद्रीच्या मनमोहक दृश्यांचा आनंद घेता येत असून प्रवासातील आठवणी जगण्याचे विविध पैलू शिकवणाऱ्या आहेत.

**असा कालानुरूप बदल**

ब्रिटिश राजवटीच्या काळात म्हणजे एक जून १९३० रोजी कल्याण ते पुणे या मार्गावर



धावणारी डेक्कन क्वीन, कालांतराने मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि पुणे जंक्शनदरम्यान धावली. प्रवासाच्या गरजांनुसार तिच्या थांब्यांमध्येही बदल झाले. दादर आणि शिवाजीनगर हे थांबे तिच्या इतिहासाचा भाग बनले. प्रवाशांना आणखी आरामदायी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गाडीमध्ये ‘डायनिंग कार’ ही सुविधा सुरू करण्यात आली. ज्यामध्ये आधुनिक मुदपाकखाना, उपाहारगृह, मुलायम आसन व्यवस्था, प्रकाशव्यवस्था असे बदल करण्यात आले. देशाच्या कानाकोपऱ्यात जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या सुमारे ९०० गाड्या कल्याण स्थानकावर थांबतात. मात्र, डेक्कन क्वीन याला अपवाद आहे. मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वगळता अन्य कोठेही ही गाडी थांबत नाही. दरम्यान, मागील तीन वर्षांपूर्वीपासून डेक्कन क्वीनला ‘विस्टाडोम कोच’ही जोडण्यात आला आहे. अनेक बदल करूनही प्रवाशांच्या मनात किंतु-परंतु न आणता कोणत्याही ऋतूत, बदलत्या हवामानाला तोंड देत प्रवाशांना सुलभ सेवा देणारी दख्खनची राणी आकर्षणाचा केंद्रबिंदू झाली आहे.

# महापालिकेच्या जलतरण तलावाच्या खाजगीकरणाचा सपाटा

## महापालिकेच्या वतीने शहरातील १३ पैकी १२ सार्वजनिक जलतरण तलाव ठेकेदारांच्या ताब्यात देण्यात आले आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या क्रीडा विभागाकडून शहरातील १३ पैकी १२ जलतरण तलावाचे खासगीकरण केले आहे. हे जलतरण तलाव तीन वर्षापासून ठेकेदाराच्या ताब्यात दिले आहेत. कारण, जलतरण तलावावर नियमित खर्च करणे परवडत नाही. याकरिता उपलब्ध मनुष्यबळ, इतर सुविधा पुरविताना महापालिकेची दमछाक होत आहे. महापालिकेच्या जलतरण तलावास चांगला प्रतिसाद मिळत असून जलतरण तलावाचे उत्पन्न लाखात तर देखभालीचा खर्च कोटीत जावू लागला आहे. त्यामुळे जलतरण तलाव पालिकेसाठी 'पांढरा हत्ती' ठरु लागली आहेत. यामुळे जलतरण तलाव खासगीकरणाचा निर्णय महापालिकेकडून घेतला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील १२ सार्वजनिक जलतरण तलाव ठेकेदारांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. पुढील तीन वर्षे हे तलाव संबंधित ठेकेदार चालविणार आहे. तिकीट विक्री, स्वच्छता, सुरक्षा, पाणी शुद्धीकरण आदी सर्व कामकाज ते पाहणार आहे. परिणामी, महापालिकेच्या कोट्यवधी रूपये खर्चाची बचत होणार आहे, असा दावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.




### तलाव खाजगी एजन्सींना चालविण्यास देण्याचा निर्णय

**» महानगरपालिकेच्या क्रिडा विभागाचे एकूण 13 सार्वजनिक तलाव आहेत. त्या तलावावर पोहण्यासाठी मुलांसह नागरिकांची दररोज मोठी गर्दी होते. उन्हाळ्यात तुंडूब गर्दी होते. तलाव संचालन, देखभाल व दुरूस्तीचा खर्च महापालिकेस परवडत नाही म्हणून महापालिकेने सर्व तलाव खाजगी एजन्सींना चालविण्यास देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार एक-एक करीत सर्व तलावांचे खासगीकरण करण्यात आले आहे.**

चिंचवडच्या केशवनगरमधील वस्ताद बाळासाहेब गावडे जलतरण तलावासह निगडी, प्राधिकरणातील तलावाचेही खासगीकरण करण्यात येत आहे. हा तलाव तीन वर्षांसाठी एका खासगी एजन्सीला देण्यात आला असून, ती एजन्सी महापालिकेस एकूण 25 लाख 56 हजार रूपये देणार आहे.

> महानगरपालिकेचे शहरातील 13 जलतरण तलावांपैकी 12 तलाव तीन वर्षे चालविण्यासाठी खासगी एजन्सींना देण्यात आले आहेत. सध्यस्थितीत मोहननगर, चिंचवड येथील राजर्षी शाहू महाराज तलावाची दुरूस्तीचे काम सुरू आहे. हे काम संपल्यानंतर तो तलावही खासगी एजन्सीला देण्यात येईल.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका.**

> महापालिकेच्या जलतरण तलावावरील पाण्याचे नियमितपणे शुद्धिकरण करणे, तलावावर आवश्यक संख्येने जीवरक्षक नेमणे, पोहोण्यास येणाऱ्यांना चांगली सेवा देणे. सर्व आवश्यक सुविधा पुरविणे. वीज बिल भरणे. किरकोळ दुरूस्ती करणे आदी खर्च कामांची जबाबदारी संबंधित ठेकेदार एजन्सीची आहे. इमारतीस महापालिकेचा सुरक्षा रक्षक असणार आहे. महापालिकेने निश्चित केलेले तिकीट दर असणार आहे.
>
> **- पंकज पाटील, उपायुक्त, क्रिडा विभाग, महानगरपालिका.**

महानगरपालिकेच्या क्रिडा विभागाचे एकूण 13 सार्वजनिक तलाव आहेत. त्या तलावावर पोहण्यासाठी मुलांसह नागरिकांची दररोज मोठी गर्दी होते. उन्हाळ्यात तुंडूब गर्दी होते. तलाव संचालन, देखभाल व दुरूस्तीचा खर्च महापालिकेस परवडत नाही म्हणून महापालिकेने सर्व तलाव खाजगी एजन्सींना चालविण्यास देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार एक-एक करीत सर्व तलावांचे खासगीकरण करण्यात आले आहे.

पहिल्या टप्प्यात संभाजीनगर, वडमुखवाडी, यमुना नगर, पिंपळे गुरव, भोसरी, पिंपरी गाव, सांगवी, कासारवाडी, नेहरूनगर आणि थेरगाव असे एकूण दहा तलावांचे खासगीकरण करण्यात आले. गेल्या महिन्यात निगडी, प्राधिकरणातील छत्रपती शिवाजी महाराज तलावाचे खासगीकरण करण्यात आले.

# पिंपरी, चिंचवड आणि भोसरी एमआयडीसीत होणार अग्निशमन केंद्र


## भोसरीतील प्लॉट एफ-टू ब्लॉकच्या भूखंडावर उभारणार अग्निशमन केंद्र; महापालिकेकडून २२ कोटी ८४ लाखांची निविदा प्रसिद्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी एमआयडीसीसाठी महापालिका स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणार आहे. हे केंद्र एमआयडीसीने दिलेल्या टाटा मोटर्सच्या मालवाहतूक प्रवेशद्वारासमोरील मोकळ्या भूखंडावर उभारण्यात येणार आहे.

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी एमआयडीसीसाठी महापालिका स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणार आहे. हे केंद्र एमआयडीसीने दिलेल्या टाटा मोटर्सच्या मालवाहतूक प्रवेशद्वारासमोरील मोकळ्या भूखंडावर (प्लॉट क्रमांक एफ-टू ब्लॉक) याठिकाणी उभारण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने २२ कोटी ८४ लाख ७५ हजार रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. हे अग्निशमन केंद्र उभारल्यानंतर एमआयडीसीमधील लागणाऱ्या आगीवर तत्काळ नियंत्रण मिळवण्यात यश येणार आहे.

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी एमआयडीसी परिसरात लघू, सूक्ष्म आणि मध्यम असे सुमारे आठ हजार उद्योग आहेत. या उद्योगांमध्ये सुमारे सात लाखांहून अधिक कामगार काम करतात. एमआयडीसीतील एखाद्या कंपनीला आग लागल्यास संत तुकारानगर येथील अग्निशमन केंद्रावर अवंलबून राहावे लागत होते. बंब येण्यास अधिकचा वेळ लागत असल्याने उद्योजकांचे मोठ्या प्रमाणात नुकसात होत होते. उद्योगांसाठी एमआयडीसी परिसरात स्वतंत्र अग्निशमन केंद्र असावे, यासाठी एमआयडीसीने भोसरी येथील प्लॉट क्रमांक एफ-टू ब्लॉक येथे भूखंड राखीव ठेवला होता.




या भूखंडावर अग्निशमन केंद्र उभारण्याची पिंपरी-चिंचवड लघु उद्योग संघटनेची अनेक वर्षांपासून मागणी होती. यासंदर्भात, उद्योग मंत्र्यांकडे बैठका झाल्या. त्यानंतर महापालिकेने हालचाली केल्या. अग्निशमन केंद्र उभारण्यासाठी मे. एनव्हायरोसेफ कन्सल्टंट यांची नेमणूक केली. त्यानंतर महापालिकेने नुकतीच महापालिकेने २२ कोटी ८४ लाख ७५ हजार ५७६ रुपयांची निविदा प्रसिध्द केली आहे.

### सर्व सुविधांनी युक्त चार मजली इमारत

**» अग्निशमन केंद्र चार मजल्यांचे असणार आहे. तळमजल्यावर ५ अग्निशमन वाहनांसाठी पार्किंग, कंट्रोल रूम, मटेरियल स्टोअर, मीटर रूम,५ लाख लिटर क्षमतेचे जीएसआर, लिफ्ट आणि जिना, पहिल्या मजल्यावर पुरुष आणि महिला जवानांसाठी रेस्ट रूम, दुसरया मजल्यावर संगणक कक्ष, टिटोरिअल रूम, क्लास रूम, ट्रेनी रूम, ग्रंथालय, तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर दोन टू बीएचके सदनिका असणार आहे.**

> एमआयडीसीने अग्निशमन केंद्र उभारण्यासाठी एफ- टू ब्लॉक येथील भूखंड महापालिकेच्या ताब्यात दिला आहे. या ठिकाणी अत्याधुनिक असे अग्निशमन केंद्र आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासी व्यवस्था उभारण्यात येणार आहे. या केंद्रामुळे एमआयडीसी आणि परिसरातील रहिवासी भागात आगीच्या घटना घडल्यास ती विझविण्यासाठी मदत होणार आहे.
>
> **- मकरंद निकम, शहर अभियंता, महापालिका.**

# पुरंदरमध्ये फळ उत्पादक शेतकरी संकटात

## शेतकऱ्यांच्या आर्थिक गणितावर पुन्हा संकट कोसळले, या पावसाने फळबागांचे अर्थकारण ठप्प केले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात गेल्या 10 दिवसांपासून मुसळधार पावसासोबत वातावरणातील बदलामुळे अंजीर, पेरू, सीताफळ, डाळिंब बागांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक गणितावर पुन्हा संकट कोसळले आहे. या पावसाने फळबागांचे अर्थकारण ठप्प केले आहे.

पुरंदर तालुक्यातील 52 हेक्टरवर अंजीर लागवड केली आहे. सोनोरी, दिवे, काळेवाडी, गुऱ्होळी, राजेवाडी, वाघापूर, सुपे खुर्द, वनपुरी, आंबळेसह अनेक गावांमध्ये अंजिराचा खट्टा बहार आहे.

मात्र, पावसामुळे व वातावरणातील बदलामुळे अंजीर तडकणे, फळकुज, तांबेराचा प्रादुर्भाव वाढला आहे. लाल कोळी, मावा, तुडतुड्याचा प्रभाव आहे. पावसाच्या नुकसानीतून बचावलेल्या फळबागांवर औषध फवारणी सुरू आहे.



### मुसळधार पावसाने पेरूची झाडे उन्मळून पडली

» तालुक्यात पेरूची 280 हेक्टर लागवड करण्यात आली आहे. तालुक्यात अवकाळी पावसामुळे पेरूची झाडे काही ठिकाणी उन्मळून पडली. या पिकाला देवी, फळकुज, फळमाशीचा प्रादुर्भाव होणार आहे. पेरूला शंभर ते तीनशे रुपये प्रतिक्रेट सासवड बाजारपेठेत भाव मिळत आहे.

तालुक्यात सीताफळाची लागवड 2200 हेक्टरवर केली आहे. परंतु, काही प्रमाणात उन्हाळी सीताफळाची फुलधारणा सुरू आहे. मात्र, मे महिन्यात झालेल्या जोरदार अवकाळी पावसाने फुलधारणाही गळून जात आहे.

तालुक्यात अवकाळी पावसामुळे पेरूची झाडे काही ठिकाणी उन्मळून पडली. या पिकाला देवी, फळकुज, फळमाशीचा प्रादुर्भाव होणार आहे. पेरूला शंभर ते तीनशे रुपये प्रतिक्रेट सासवड बाजारपेठेत भाव मिळत आहे.

त्यामुळे पुढील वर्षी सीताफळाचे उत्पन्न घटण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. तालुक्यात डाळिंबाची 300 हेक्टरवर लागवड केली आहे.

> अवकाळी पावसाने पुरंदर तालुक्यात फळबागा, कांदा, तरकारी पिकांसह गहू, ज्वारी, हरभरा, पिकाचे नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजित नुकसान अहवाल वरिष्ठ कार्यालयास कळविला आहे. वरिष्ठांचे आदेश आल्यास तत्काळ महसूल विभाग, कृषी विभाग व पंचायत समितीतर्फे संयुक्त पंचनामे करण्यात येतील.
>
> **- सूरज जाधव, कृषी अधिकारी, पुरंदर**

> मागील दहा दिवस पडलेल्या मुसळधार पावसामुळे अंजीर बागेचे मोठे नुकसान झाले आहे. बागांसाठी झालेला खर्च निघेल की नाही, याची शाश्वती नाही. सध्या झाडावर अंजीर तडकले आहेत. रोगराईचा प्रादुर्भाव वाढणार आहे.
>
> **- अर्जुन रामचंद्र काळे, अंजीर उत्पादक शेतकरी, सोनोरी**

डाळिंबबागेत सध्या पाणी दिले जात नाही. बागेत उष्णता निर्माण केली जात आहे. परंतु, अवकाळी पावसामुळे डाळिंब झाडांना फुट निघून त्याची फळधारणेची क्षमता कमी होणार आहे.

वातावरणातील बदलामुळे अंजीर तडकणे, फळकुज, तांबेराचा प्रादुर्भाव वाढला आहे. लाल कोळी, मावा, तुडतुड्याचा प्रभाव आहे. पावसाच्या नुकसानीतून बचावलेल्या फळबागांवर औषध फवारणी सुरू आहे. मुसळधार पावसासोबत वातावरणातील बदलामुळे अंजीर, पेरू, सीताफळ, डाळिंब बागांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक गणितावर पुन्हा संकट कोसळले आहे. या पावसाने फळबागांचे अर्थकारण ठप्प केले आहे.

# पोलीस पाटील हे पोलिसांचे नाक-डोळे : संदीपसिंग गिल

## शिरूर तालुक्यातील पोलीस पाटलांच्या बैठकीत पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

पोलीस पाटील हे पोलिसांचे नाक आणि डोळे असून, गावातील अनुचित घटना, संशयित आणि अनोळखी व्यक्तींची माहिती तात्काळ पोलिसांना देणे आवश्यक आहे. तसेच, ग्रामपंचायत प्रशासन, पोलीस पाटील, पोलीस आणि ग्रामस्थांनी नोकरी-व्यवसायानिमित्त येणाऱ्या भाडेकरूंवर कडक नजर ठेवावी, असे आवाहन पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी केले. खंडाळे आणि रांजणगाव हद्दीत आढळलेल्या जळालेल्या मृतदेहांच्या तपासासाठी विशेष पोलीस पथक नेमण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

शिरूर तालुक्यातील पोलीस पाटलांच्या बैठकीत गिल बोलत होते. यावेळी पोलीस पाटलांनी तालुक्यातील काही समस्या मांडल्या. यामध्ये मोटारसायकल चोरीचे वाढते प्रमाण, बिबट्याचा वाढता उपद्रव, बेट भागातील अवैध धर्मांतर, गुऱ्हाळांमुळे परप्रांतीयांचा वाढता भरणा, चाकण-शिक्रापूर रस्त्यावरील अपघात आणि पुणे-नगर महामार्गावरील वाहतूक कोंडी यांचा समावेश आहे. या समस्यांवर लवकरात लवकर उपाययोजना केल्या जातील, असे गिल यांनी आश्वासन दिले.

केंदूर ग्रामपंचायतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याशिवाय घराची नोंद न करण्याचा निर्णय घेतला, तर जातेगाव बुद्रुक येथे मुलींना लाठी-काठी प्रशिक्षण दिले जात आहे.




### मृतदेह प्रकरणात विशेष पथकाची नियुक्ती

» खंडाळे आणि रांजणगाव हद्दीत जळालेले मृतदेह सापडून सात दिवस उलटले तरी आरोपी सापडलेले नाहीत. यासाठी विशेष पोलीस पथक नेमण्यात येणार आहे. पुणे-नगर महामार्गावरील गावांची लोकसंख्या पाच ते सहा पटींनी वाढली असून, भाडेकरूंविषयी अद्ययावत माहिती नसल्याने तपासात अडथळे येत आहेत. यावर उपाय म्हणून भाडे कराराचे ॲप तयार केले जाणार असून, बाहेरून येणाऱ्या व्यक्तींची माहिती देणे आणि भाडेकरूंची कागदपत्रे पोलीस पाटील, सरपंच आणि ग्रामपंचायतीला सादर करणे घरमालकांना बंधनकारक केले जाईल, असे गिल यांनी सांगितले.

### पोलिसांचे निर्देश

» गिल यांनी सांगितले की, शाळा-महाविद्यालयांबाहेर टवाळखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलीस तत्पर राहतील. पोलीस पाटलांनी महिन्यातून एकदा गावातील माहिती अधिकाऱ्यांना द्यावी आणि अंमलदाराने आठवड्यातून एकदा गावाला भेट द्यावी. रोमिओंचा बंदोबस्त करण्यासाठी ग्रामस्थ आणि कुटुंबियांचा सहभाग आवश्यक आहे. मुलींना स्वसंरक्षणाचे धडे द्यावेत, तरुणांनी सायबर गुन्ह्यांपासून सावध राहावे, ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करावी आणि सर्व ग्रामपंचायतींनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

या दोन्ही उपक्रमांचे गिल यांनी कौतुक केले.

ग्रामपंचायत प्रशासन, पोलीस पाटील, पोलीस आणि ग्रामस्थांनी नोकरी-व्यवसायानिमित्त येणाऱ्या भाडेकरूंवर कडक नजर ठेवावी, असे आवाहन पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी केले. खंडाळे आणि रांजणगाव हद्दीत आढळलेल्या जळालेल्या मृतदेहांच्या तपासासाठी विशेष पोलीस पथक नेमण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.